Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 05 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०५ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज देशाच्या राजधानी दिल्लीमधील रेल्वे, मेट्रो आणि आरोग्याच्या संबंधित १२ हजार २०० कोटी रुपयांच्या योजनांचं उद्घाटन आणि लोकार्पण होणार आहे. या उद्‌घाटनाच्या दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गाजियाबाद जिल्ह्यातील साहिबाबाद रेल्वे स्थानक ते दिल्लीतील न्यू अशोकनगर रेल्वेस्थानकादरम्यान नमो भारत रेल्वेनं प्रवासही करणार आहेत.

****

अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिवन दोन दिवसीय भारत दौऱ्यावर आज येत आहेत. या दौऱ्यात ते समपदस्थ अजीत डोभाल आणि भारताचे परराष्ट्र मंत्री डॉ.एस. जयशंकर यांच्यासोबत  बैठक करणार आहेत. या बैठकीत दोन्ही देशातील अंतराळ, संरक्षण आदी क्षेत्रासंबंधावर चर्चा होणार आहे. त्याशिवाय चीनच्या हिंद व प्रशांत महासागरातील प्रकल्पाविषयी चर्चा होणार आहे.

****

बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिका ऑस्ट्रेलियानं ३-१ अशी जिंकली आहे. सिडनी इथं झालेल्या पाचव्या सामन्यात आजच्या तिसऱ्या दिवशी भारतीय संघानं दिलेलं १६२ धवांच लक्ष्य ऑस्ट्रेलिया संघानं ४ गड्यांच्या मोबदल्यात पुर्ण केलं.

आज तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात झाल्यानंतर भारतीय संघ केवळ १५७ धावांवर सर्वबाद झाला. भारतीय गोलंदाज जसप्रित बुमराहला मालिकावीर तर ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज स्कॉट बोलंड याला सामनावीर किताबानं गौरवण्यात आलं.

ऑस्ट्रेलियानं बॉर्डर–गावस्कर कसोटी मालिका तब्बल दहा वर्षांनी जिंकली आहे. तसच या मालिका विजयामुळं ऑस्ट्रेलिया संघानं कसोटी विश्व करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्यांचा सामना आता दक्षिण अफ्रिकेशी होणार आहे.

****

अहिल्यानगर जिल्हा विभाजन, वैद्यकीय महाविद्यालयाची निर्मिती असे अनेक प्रश्न सोडवू, असं विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी म्हटलं आहे. ते अहिल्यानगर इथं सर्वपक्षीय सत्काराला उत्तर देत होते. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, पोपटराव पवार यांच्यासह अनेक नागरिक यावेळी उपस्थित होते.

****

सज्जनांनी सक्रिय होणं हेच राष्ट्र निर्माणासाठी प्रेरक असतं, हे आर्य चाणक्य यांचे विचार आजच्या काळातही लागू पडतात, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. काल मुंबई इथं शेठ गोकुळदास तेजपाल, नाट्यगृहात झालेल्या चाणक्य नाटकाच्या १ हजार ७१० व्या प्रयोगाला फडणवीस यांनी उपस्थिती लावली. त्यावेळी ते बोलत होते. या नाटकाच्या माध्यमातून पुन्हा एकदा आर्य चाणक्य यांचे विचार लोकांपर्यंत पोहचवण्याचं काम होत असल्याचं फडणविस यांनी सांगितलं.

****

नांदेड जिल्ह्यात माळेगाव यात्रेतल्या शासकीय कार्यक्रमांचा आज समारोप होत आहे. या यात्रेत कुस्त्यांची दंगल आज होणार असून, आठवडाभरात झालेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळाही होणार आहे. काल या स्पर्धेत नागरिकांनी शंकरपटाचा थरार अनुभवला. ५८ बैलजोड्यांनी या शर्यतीत भाग घेतला होता. त्यापैकी हिंगोली जिल्ह्याच्या औंढा तालुक्यात पिंपळदरी इथले महादू कोंडिबा रिटे यांच्या बैलजोडीने निर्धारित अंतर अवघ्या साडे चार सेकंदात पार करत पहिला क्रमांक पटकावला.

****

शिक्षण घेऊन रोजीरोटीसाठी जॉब शोधण्याची संकल्पना आता कालबाह्य झाली आहे. त्यामुळं स्वतःच्या आवडीनुसार करिअर निवडणारी पिढी घडविणं हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दीष्ट असल्याचं प्रतिपादन शिक्षण आणि संगणक क्षेत्राच्या अभ्यासक डॉ. रेवती नामजोशी यांनी केल आहे. त्या छत्रपती संभाजीनगर इंथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सलग्न महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांसाठी आयोजित कार्यशाळेत बोलत होत्या.

****

मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाअंतर्गत काल विद्यापीठ ज्ञान स्त्रोत केंद्राच्या वतीनं ग्रंथ दिंडी काढण्यात आली. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू रवींद्र कुलकर्णी, संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. नंदकिशोर मोतेवार यांच्यासह विद्यापीठाच्या विविध विभागातील शिक्षक, विद्यार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी असे ५०० पेक्षा अधिक जण ग्रंथ दिंडीमध्ये सहभागी झाले.

****

भारतीय टेनिसपटू सुमित नागपालने न्यूझीलंडमध्ये सुरू असलेल्या एएसबी क्लासिक टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्याने आज सकाळी अंतिम पात्रता फेरीत फ्रांसच्या एड्रियन मॅनारिनोचा पराभव केला. नागपालने काल झालेल्या पात्रता फेरीच्या सामन्यात न्यूझीलंडच्या अलेक्झांडर क्लिंचारोव्हचा पराभव केला होता.

या स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत उद्या, युकी भांब्री आणि अल्बानो ऑलिवेट्टी या जोडीचा सामना नेदरलँडच्या सँडर एरेंड्स आणि ब्रिटनच्या ल्यूक जॉन्सन या जोडीशी होणार आहे.

****

राज्याचे पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते काल  जिल्हा परिषद, धुळे इथं ११ नविन रुग्णवाहिकांचं लोकार्पण  करण्यात आलं. धुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्राना राज्यस्तरावरुन या ११ नविन रुग्णवाहिका प्राप्त झाल्या होत्या.

****